जगभर

# धर्मद्रोह, देशद्रोह : संदर्भ – नायजेरिया व बांगलादेश

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

नायजेरियातील चिबोक या गावातून सुमारे दोन वर्षांपूर्वी (१४ एप्रिल २०१४) शाळेच्या परीक्षेसाठी आलेल्या व होस्टेलमध्ये राहिलेल्या २७० हून अधिक मुलींना रातोरात पळवण्यात आले. हे कृत्य उत्तर नायजेरियात सक्रिय असणाऱ्या बोको हराम (शब्दश: अर्थ - पाश्चात्य शिक्षण पाप आहे) या इस्लामी संघटनेचे. या कृत्याचा मलाला युसुफझाई पासून मिशेल ओबामापर्यंत सगळ्यांनी निषेध नोंदवला, मुलींच्या सुटकेची मागणी केली. काही मुली नंतरच्या काही महिन्यात बोको हरामच्या तावडीतून पळाल्या व परतल्या. पण आजवर २१९ मुलींचा पत्ता नाही. त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होणे, त्यांचे लिलाव होणे, सक्तीने बोको हरामच्या सैनिकांशी विवाह लावणे - या सर्व शक्यतांनी पालक वेडेपिसे झाले. काहीजण या चिंतेने खंगून मरणही पावले. राजधानीत मोर्चे काढून या मुलींची सुटका करा असे सरकारला विनवणे एवढेच त्यांच्या हातात.

या १६-१७ वर्षांच्या मुलींचा पहिला अपराध - त्या शाळेत शिकत होत्या. त्यातल्या काही जणींचा दुसरा अपराध - त्या ख्रिश्चन होत्या. (बोको हरामने त्यांचे धर्मांतर केले).

नायजेरियाच्या उत्तर भागात बोको हरामने अनेक खेडी बेचिराख केली आहेत, मुस्लीम नसलेल्यांना हुसकावून लावले आहे, ९०० हून जास्त शाळा जाळल्या आहेत, १५०० बंद पाडल्या आहेत, किमान ६०० शिक्षकांना ठार मारले आहे. त्यामुळे आज तेथे मुलांना शिक्षणच नाही. अक्षम सरकार, भ्रष्ट लष्कर नागरिकांना संरक्षण देवू शकत नाही. लष्करावर तर नागरिकांचा विश्वासही नाही - लष्कर त्यांच्यावरच अत्याचार करते.

अमेरिकेची मनुष्य-विरहित निरीक्षक यंत्रणा थोडीफार तो जंगली प्रदेश मुलींच्या शोधात धुंडाळते.

सीएनएन या टीव्ही वाहिनीने या मुलींचा मागील वर्षीचा एक व्हीडिओ प्रसृत केला. त्यात १४-१५ मुली दिसतात. त्या आपली सुटका करावी असे म्हणतात. हा व्हीडीओ बोको हराम व सरकार यांच्यातील सौदेबाजीचा भाग असावा, त्यामुळे सरकार त्यावर बोलत नाही.

सीएनएनने हा व्हीडीओ मुलींच्या पालकांना दाखवला. अपहरणानंतर प्रथमच एका आईला तिची मुलगी पहायला मिळाली. शक्य असेल तर तिला त्या स्क्रीनवरून उचलून मी जवळ घेईन असे ती ओक्साबोक्शी रडत म्हणते. इतर मुलीही या मातांनी ओळखल्या.

व्हीडीओत शेवटी एक मुलगी ''आम्ही सर्वजणी ठीक आहोत'' असे म्हणते. 'सर्व' शब्दाने उर्वरित मुलीही जिवंत असाव्यात असे पालकांना वाटत आहे.

व्हीडीओत दिसणाऱ्या मुली दोन वर्षांपूर्वी दिसत असत तशाच दिसतात, असा एक आक्षेप आहे. एका मुलीला आजची तारीख २५ डिसेंबर आहे असे म्हणणे बोको हरामने भाग पडले असावे.

या प्रकारच्या इस्लामला आता गँगस्टर इस्लाम म्हटले जाते. त्याला आजवर मूलतत्त्ववादी म्हटले जात असे. पण त्या वर्णनाने या गुंडांचा गौरव होण्याची शक्यता आहे. इस्लामचे काहीही ज्ञान नसताना व त्याची जरुरीही नसल्याने निखळ गुंडगिरीला तात्त्विक मुलामा देणे एवढीच धर्माची त्यांना आवश्यकता आहे. ही संज्ञा पॅरिस व ब्रसेल्सवरील आतंकवादी हल्ल्यांनंतर प्रचारात आली आहे. बोको हरामचे सैनिक आता इस्लामिक स्टेटलाही सामील होत आहेत अशी आणखी चिंताजनक घडामोड आहे.

वर उल्लेख केलेल्या मुलींच्या अपहरणाखेरीज या प्रश्नाचे गांभीर्य पुढील आकडेवारीवरून लक्षात यावे. बोको हरामच्या अखत्यारीतील प्रदेशातून आजवर नायजेरियातून २२ लाख लोक विस्थापित झाले आहेत. त्यातील बहुतांश शेजारच्या देशांमध्ये गेले आहेत पण देशांतर्गत विस्थापितांची संख्याही साडेचार लाख असावी. त्याचबरोबर या प्रदेशात अन्नाचा तुटवडा वाढत आहे. रोज सुमारे जास्तीच्या २०० मुलांची उपासमार होते. एकूण विविध संलग्न देशात ४२ लाख लोक कुपोषित आहेत, त्यातील आठ लाख बोको हरामच्या उत्तर नायजेरियात आहेत.

मे-मध्याला या पार्श्वभूमीवर निदान एक शिखर परिषद तरी नायजेरियन सरकारने आयोजित केली. त्यात बोको हरामच्या उपद्रवाने संत्रस्त झालेल्या संलग्न देशांनी भाग घेतला. त्यात बेनीन, कामेरून, चाड, गायना, गेबन, नायजेर, सेनेगल वगैरे शेजारी आफ्रिकन देशांबरोबर फ्रान्सनेही भाग घेतला. त्यात बोको हराम विरुद्ध संयुक्त आघाडी उघडण्याची जरुरी नोंदवण्यात आली. त्यासाठी लष्करी सहकार्य, बोको हरामच्या योद्ध्यांना आश्रय न देणे, कुपोषणावर उपाय करणे, इत्यादी धोरणे आखण्याची निकड अधोरेखित करण्यात आली.

या शिखर परिषेदेचे फलित लवकरच कळेल. पण या प्रश्नाची आंतरराष्ट्रीय दखल घेतली जाण्याचे पहिले पाऊल, उशीरा का

होईना उचलले गेल्याचे दिसते.

दरम्यान या २१९ मुलींपैकी एका मुलीची सुटका लष्कराने केली तर दुसरी एक बोको हरामने पळवलेली मुलगीही मुक्त झाली. त्यातील एकीला या कैदेत बलात्कारातून मूल झाले आहे. या मुलींचे दुर्दैव सुटका होण्याने संपत नाही. हे मूल आपल्याला नवऱ्यापासून झाले व त्याला बोको हरामने ठार मारले असे ती सांगते. जे कोणी बोको हरामच्या तावडीत होते, ते आंतकवादी होऊनच बाहेर येतात असा समाजाचा पक्का ग्रह आहे. दहा वर्षांहून लहान मुलींनाही बोको हरामने आत्मघातकी हल्लेखोर म्हणून वापरलेले आहे. त्यामुळे गाव अशांना वाळीत टाकते. म्हणून तिचा हा पवित्रा.

## बांगलादेशातील दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी

शेजारच्या बांगलादेशात अलीकडच्या काही वर्षात वर उल्लेख केलेल्या गँगस्टर इस्लाम चा प्रभाव वाढत आहे. धर्म व राजसत्ता यांची फारकत असावी की नसावी हा वाद आता हिंसक रूप घेत आहे. त्या देशासाठीच नव्हे तर भारतासाठीही हा चिंतनीय प्रवाह आहे.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात नझिमुद्दीन समद या फेस-बुकवर भाष्य करणाऱ्या विद्यार्थ्याची हत्या करण्यात आली. हल्लेखोरांनी कोयत्याने त्याचा शिरच्छेद केला, मग त्याच्यावर पिस्तुलाने गोळ्या घातल्या. समद उपरिनिर्दिष्ट गँगस्टर इस्लाम म्हणजे इस्लामिक स्टेट, बोको हराम, अल-कईदा यांच्या विरोधात होता, हा त्याचा गुन्हा.

मे च्या तिसऱ्या आठवड्यात, ख्रिश्चन धर्माचा प्रचार करतो आणि बाउल नावाच्या बंगाली संगीताचा चाहता आहे म्हणून एका होमिओपॅथिक डॉक्टरचा असाच भयानक खून करण्यात आला. बाउल हे वैष्णवी हिंदू आणि सुफी मुस्लीम यांचे आध्यात्मिक संगीत आहे आणि ते (तलेबानप्रमाणेच) या इस्लामला मंजूर नाही.

सध्या ढाका विद्यापीठातील एका प्रोफेसरवर अशीच मृत्यूची तलवार टांगती आहे. कारण त्याने वर्गातील एका मुलीला बुरखा उचलून चेहरा दाखवायला सांगितले. त्याला आता २४ तास पोलीस संरक्षण आहे. या विद्यापीठात २०१४ पासून प्रोफेसरांच्या हत्या झालेल्या आहेत. २०१३ पासून असे अनेक निरीश्वरवादी ठार मारण्यात आले आहेत (असिफ मोई उद्दीन, अहमद हैदर, अविजित रॉय, अनंत बिजोय दास, वगैरे बांगलादेशी व स्वयंसेवी संघटनात काम करणारे परदेशी).

लेखिका तस्लीमा नसरीन तर अशा धमक्यांमुळे १९९४ पासून बांगलादेशाबाहेर रहात आहेत.

आपल्याकडच्या दाभोलकर व इतरांच्या हत्येनंतरची सरकारी निष्क्रियता बांगलादेशातही आहे. या दहशतवाद्यांना भारत, अमेरिका या परकीय शक्तींची फूस आहे, तर खुन्यांना विरोधी राजकीय पक्षांचा पाठिंबा आहे असा सरकारी दावा आहे. मात्र अल्-कईदा किंवा इस्लामिक स्टेट बांगलादेशात शिरकाव करत आहे याकडे दुर्लक्ष आहे.

अशा असहिष्णुतेविरुद्ध गण-जागरण मंच ही संघटना आवाज उठवत आलेली आहे. सलमान रश्दीबरोबर अनेक मुस्लीम व धार्मिक स्वातंत्र्याच्या आंतरराष्ट्रीय विचारवंतांनीही या कृत्यांचा निषेध केला आहे.

बांगलादेशातील कडव्या इस्लामी संघटनांनी अशा ८४ निरीश्वरवाद्यांची यादी गृह-खात्याकडे सोपवलेली आहे. हे सर्व त्यांचे अधिकृत लक्ष्य आहेत. त्यात समलिंगी संबंधांचे समर्थक आहेत, मुक्त समाजाचे प्रचारक आहेत, धर्माधिष्ठित विचाराचे विरोधक आहेत, लेखक, कवी आहेत. अशा पंधराहून अधिक व्यक्तींना गेल्या वर्षात राजरोस खुले आम ठार मारण्यात आले. हत्या करणे, तीही अत्यंत निर्घृणपणे व सार्वजनिक, जेणेकरून दहशत वाढावी, हा या हत्याकांडाचा उद्देश आहे.

याची मुळे बांगलादेशाच्या स्वातंत्र्यापासून शोधावी लागतील. तेव्हा पाकिस्तानच्या वसाहतवादी जुलमी राजवटीतून बाहेर पडण्यासाठी बांगला मुक्तीचा - बंगाली सहिष्णू संस्कृती टिकवणे - संघर्ष झाला. त्या दरम्यान काही कट्टर मुस्लीम संघटनांना पाकिस्तानचे वर्चस्व संपल्यास खरा इस्लाम अशुद्ध होणार, त्याची राजमान्यता जाणार ही भीती होती. तेव्हा पाकिस्तानधार्जिण्या मुस्लीम शक्तींनी बांगला-मुक्तीचा विरोध केला. स्वातंत्र्याला अनुकूल लोकांच्या हत्या केल्या, स्त्रियांवर बलात्कार केले. या गुन्हेगारांवर आता खटले भरले जात आहेत. त्यातील काहींना फाशीही देण्यात आले. मे महिन्यात अशा एका पाकिस्तानी हस्तकाला फाशी देण्यात आली. हा अशा खटल्यात मृत्युदंड देण्यात आलेला चौथा धर्म गुरु. (जमाते-इस्लामीचा नेता - मोती उर रहमान निझामी).

म्हणजे, एकीकडे राज-सत्ता व्याख्येनेच तिची मक्तेदारी असणारी हिंसा करते, त्याविरुद्ध धार्मिक माथेफिरू त्यांच्या धर्माच्या आकलनानुसार धर्म-मान्य हिंसा करतात असे चित्र आहे.

पण प्रश्न अधिक खोलातही जातो - देश-द्रोह म्हणजे काय, धर्म-द्रोह म्हणजे काय आणि यातील वरचढ- मृत्युदंड देण्याइतका गंभीर - गुन्हा कोणता? मुळात तो गुन्हा असतो की ते भिन्न मत असू शकते, जे २१व्या शतकात कोणत्याही समाजात मान्य असावे?

हेतुपुरस्सर किंवा परिणामत: या दोन विचार-प्रणालीतील संवादाची शक्यता मात्र दिवसेंदिवस आक्रसत चालली दिसते.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*